(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – IV ISSN 2277-8063

# भारतीय संविधान : सार्वभौम लोकशाहीचा आधारस्तंभ

**प्रा. डॉ. स्मिता जयेंद्र खोपडे** श्री शिवाजी मराठा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शुक्रवार पेठ पुणे 2

---

**प्रस्तावना**

भारत देश विविधतेने नटलेला आहे . आपल्या देशात अनेक भाषा , अनेक धर्म, संप्रदाय भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक वैविध्य आहे. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रवाद उदयाला आला. राष्ट्रवादी भावनेतूनच १८५७ चा उठाव झाला, असा एक प्रवाह आहे .[१] तसेच राजकीय ऐक्याची जाणीव, परकीय सत्तेविरुद्ध असंतोष, सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी, पाश्चिमात्य शिक्षणाचा परिणाम, वृत्तपत्रांचे योगदान, प्रेरणादायी राष्ट्रीय साहित्य, दळणवळणाच्या सुविधा, केंद्रीय शासन पद्धती, ब्रिटिशांचे धोरण, शेतकरी उठाव, इत्यादी बाबीमुळे राष्ट्रवाद उदयाला आला .[२] असे आधुनिक भारताचे इतिहास अभ्यासक डॉ. गजानन भिडे सांगतात. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाला.[३] तेंव्हा आपल्या देशात सुमारे ६०० (सहाशेच्या आसपास) संस्थानं होती.[४] सर्व संस्थानांना आणि सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, प्रांतिक, भाषिक आणि वैचारिक वैविध्य असणाऱ्या देशाला एकत्र बांधण्याचे महत्वपूर्ण कार्य भारतीय संविधानाने केले आहे, स्वातंत्र्यानंतर देशाचा कारभार चालविक्रयासाठी संविधानाची नितांत गरज होती. त्यामुळे घटना समितीची स्थापना करण्यात आली. घटना समितीची पहिली बैठक डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. समितीने डॉ. राजेंद्रप्रसाद यांची नियमित अध्यक्ष म्हणून निवड केली.[५] त्यानंतर्गत मसुदा समितीची (Drafting Committee) स्थापना करण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर २९ ऑगस्ट १९४७ रोजी घटना मसुदा समितीचे अध्यक्ष झाले.[६] मसुदा समितीत एकूण सात सदस्य होते.[७] डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नामवंत कायदेतज्ञ होते तसेच ते अर्थतज्ञ, शिक्षकतज्ञ, समाजशास्त्र मानवशास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ आणि धर्मशास्त्रांचे अभ्यासक होते. त्यांच्या ज्ञानाचा परिप्रेक्ष जागतिक स्तरावरील होता. ते उच्चशिक्षित आणि तळमळीचे लोकनेते होते. त्यांनी प्राध्यापक, संपादक मजूर मंत्री म्हणून निष्ठेने काम केले होते. शेतकरी, कष्टकरी, मजूर, महिला, उपेक्षित, वंचित घटकांच्या हक्क अधिकारासाठी लोक लढा उभारला होता. ते एक प्रामाणिक, कर्तृत्ववान आणि विद्वान राष्ट्रपुरुष होते. अशा राष्ट्रपुरुषांवर संविधानाच्या निर्मितीची जबाबदारी देण्यात आली, हा देशासाठी सुवर्णक्षण होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक प्रयत्नातून संविधान तयार झाले, त्यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान देशाला सुपूर्द केले.[८] त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारत देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून झाली.[९] त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस गणराज्य तथा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. संविधानात एकूण ३९५ कलमे आणि ८+४ परिशिष्टे आहेत.[१०] पुढील काळात संविधानाच्या मूळ चौकटीत बदल न करता अनेक दुरुस्ती झालेल्या आहेत. भारतीय संविधान हा कोणत्याही स्वरूपाचा ताठर किंवा कर्मठ धर्मग्रंथ नसून लोककल्याणकारी परिवर्तनशील लोककल्याणकारी ग्रंथ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील अनुच्छेद कलम क्रमांक ३६८ नुसार संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला दिलेला आहे[११]. ती एक संविधानिक कार्यपद्धती आहे. हे लोकशाही प्रधान लोककल्याणकारी राज्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. भारतीय संविधान हे लिखित आहे, तसेच ते जेवढे ताठर आहे तेवढेच लवचिक आहे. भारतीय संविधानाचे प्रस्तावना तथा उद्देशिका (preamble) हा भारतीय संविधानाचा आरसा आहे. भारतीय संविधानाचे स्वरूप त्यामध्ये स्पष्ट केलेल्या आहे. भारत हे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाहीप्रधान गणराज्य आहे, ते न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता, एकता आणि एकात्मता [१२], अशी ग्वाही संविधानाने दिलेली आहे. आपली लोकशाही संघराज्य स्वरूपाचे आहे. आपला देश कोणत्याही परकीय सत्तेच्या अमलाखाली राहणार नाही आमचे निर्णय आम्ही घेऊ म्हणजे सार्वभौम होय. संविधानाने नागरिकांना मूलभूत हक्क आणि कर्तव्य बहाल केलेल्या आहेत.

**संविधानिक मूल्ये**

भारतीय संविधानाने समानतेचा अधिकार दिलेला आहे. संविधानातील कलम क्रमांक १४ ते १८ नुसार समानतेचा हक्क दिलेला आहे.[१३] कलम १४ = भारतातील प्रत्येक व्यक्ती कायद्यासमोर समान आहे सर्वांना समान वागणूक दिली आहे.[१४] कलम १४ धर्म, जात, वंश, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई .[१५] देशातील कोणत्याही व्यक्तीला धर्मावरून जातीवरून वंशावरून लिंगावरून किंवा जन्मस्थळावरून भेदभाव केला जाणार नाही. एखादी व्यक्ती विशिष्ट जातीची, वंशाची किंवा धर्माची आहे म्हणून भेदभाव किंवा विशेष सवलत किंवा भेदभाव केला जाणार नाही. एखादी व्यक्ती पुरुष आहे म्हणून विशेष सवलत किंवा एखादी व्यक्ती स्त्री आहे किंवा तृतीयपंथी आहे म्हणून दुय्यम वागणूक दिली जाणार नाही. जन्मस्थानावरून देखील भेदभाव करता येणार नाही. भारतातील कोणत्याही ठिकाणची व्यक्ती असली तरी उदाहरणार्थ केरळ, पश्चिम बंगाल, गुजरात, महाराष्ट्र, बिहार इत्यादी कोणत्याही राज्यातील व्यक्ती असली तरी ती व्यक्ती संविधानापुढे अर्थात कायद्यापुढे समान आहे. असे संविधानातील कलम १५ सांगते. कलम १६ सार्वजनिक सेवा योजना समान संधी.[१६] सर्व जात समूहांना सार्वजनिक सेवा योजना समान संधी. त्यांचे पर्याप्त प्रतिनिधित्व देणे. कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करणे[१७] कोणत्याही स्वरूपाची अस्पृश्यता पाळता येणार नाही. कलम १८ किताब नष्ट करणे.[१८] समाजात भेदभाव करणाऱ्या पदव्या शासन देऊ शकत नाही. अशा प्रकारे देशात समानता प्रस्थापित करण्यासाठी संविधानातील कलम १४ ते १८ ही महत्त्वाची कलमे आहेत.

स्वातंत्र्याचा अधिकार-संविधानातील कलम १९ ते २२ भारतीय जनतेला स्वातंत्र्याचा अधिकार देणारी कलमे आहेत. कलम १९ ( क) या कलमान्वये भाषण व अभिव्यक्ती स्वतंत्र्य बहाल केलेले आहे.[१९] आपले विचार भाषण, लेखन, अभियान, चित्रकला इत्यादींद्वारे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक भारतीय नागरिकाला आहे. (ख) शांततेने व विनाशास्त्र एकत्र जमण्याचे व सभा घेण्याचे स्वतंत्र्य, संघटना स्थापन करण्याचे स्वतंत्र्य, आपले मत किंवा मागण्या मांडण्यासाठी संघटना स्थापन करण्याचे स्वतंत्र संविधानाने दिलेले आहे. देशातील सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य देशातील कोणतेही भागात स्थानिक होण्याचे स्वातंत्र्य कोणत्याही आवडीचा व वैद्य असलेला व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य हे कलम अत्यंत मौल्यवान आहे. आपले विचार व्यक्त करण्याचे व्यवसाय करण्याचे संघटना स्थापन करण्याचे देशात कोणतेही भागात संचार करण्याचे व्यवस्था आणि होण्याचे स्वातंत्र्य संविधानाने दिलेले आहे. कलम २० अपराधाबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण.[२०] नवा कायदा जुन्या गुन्हेगाराला लागू होणार नाही याला जुन्या कायद्यानुसार शिक्षा होणार एकच गुन्ह्यासाठी दोनदा शिक्षा देता येणार नाही आरोपी स्वतः विरुद्ध साक्षर देणार नाही. कलम २१ या कलमाद्वारे नागरिकांना जीविताचा अधिकार दिलेला आहे.[२१] याद्वारे सुरक्षित जीवन, स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा, योग्य निवास, सन्मान, खाजगी जीवनाचा अधिकार, प्रवासाचा अधिकार दिलेला आहे. यामध्ये घटना दुरुस्ती होऊन शिक्षणाचा अधिकार २१ (क) नुसार देण्यात आला [२२]. कलम २२ नुसार अटक व स्थानबद्धता याबाबत संरक्षण.[२३] एखाद्या आरोपीला अटक का केली ती त्या आरोपीला तात्काळ सांगणे. या आरोपीला वकील घेण्याचा अधिकार. त्या आरोपीला चोवीस तासात न्यायालयात हजर करणे. त्याला कोठडीत मानवतेच्या भूमिकेतून मदत करणे. त्या आरोपीचे स्वतंत्र्य आहे. कलम २३ नुसार माणसांचा अपव्यापार किंवा वेशबिगारी याला मनाई.[२४] माणसांचे खरेदी विक्री किंवा व्यापार करता येणार नाही तसेच त्यांना मोठे बिगार म्हणून सवतीने अमानुषपणे कामाला ठेवता येणार नाही. कलम २४ नुसार बालकामगारावर बंदी.[२५] बालकांना १४ वर्षापर्यंत शिक्षण घेण्याचा हक्क आहे, त्यामुळे त्यांना कोणत्याही धोकादायक किंवा श्रमाच्या कामाला ठेवता येणार नाही. कलम २५ ते ३० संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला आपल्या धर्माचे सदसतविवेकबुद्धीने धर्माचे आचरण करण्याचा, धार्मिक संस्था चालवण्याचा, सक्ती न करता धार्मिक तत्वांचा प्रचार करण्याचे, शैक्षणिक संस्था स्थापन करून त्या चालवण्याच्या, आपली भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा जतन करण्याचा अधिकार दिलेला आहे.[२६]

शैक्षणिक अधिकार भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे. घटनेतील कलम क्रमांक २१(क) नुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीने आणि मोफत केलेले आहे.[२७] ८६ व्या घटनादुरुस्तीने २००२ साली प्राथमिक शिक्षण सवलतीच्या आणि मोफत

केले. त्याची अंमलबजावणी २०१० पासून करण्यात आली.[२८] त्याला शिक्षणाचा हक्क (Right To education) असे म्हटले जाते.[२९] तसेच संविधानातील कलम क्रमांक १४ आणि १५ नुसार कोणत्याही स्वरूपाचा भेदभाव न करता शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.[३०] कलम २९ आणि ३० नुसार अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था स्थापन करून त्या चालविण्याचा अधिकार दिलेला आहे.[३१] कलम २४ नुसार बालमजुरी नष्ट करून बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे क्रांतिकारक पाऊल उचलेले आहे.[३२] कलम क्रमांक ४१ नुसार शिक्षणासाठी सहाय्य करणे ही शासनाची जबाबदारी सांगितली आहे.[३३] कलम ४५ नुसार सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांची देखभाल आणि शिक्षण याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.[३४] कलम ४६ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व धार्मिक हितसंबंध जोपासणे .[३५] ही शासनाची जबाबदारी सांगितलेले आहे. कलम क्रमांक ५१ (ट ) नुसार आपल्या सहा ते चौदा वयोगटातील पाल्याला शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे ही प्रत्येक माता पित्याचे कर्तव्य सांगितलेले आहेत.[३६] अशा प्रकारे शिक्षणाबाबत संविधानातील तरतुदी आहेत.

संविधानाने महिलांना दिलेली अधिकार प्राचीन आणि मध्ययुगीन काळात स्त्रियांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. भेदभावामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यांना अनेक अधिकारापासून वंचित राहावे लागले. सतीप्रथेसारख्या अमानुष प्रथा परंपरामुळे त्यांना त्यांचे अस्तित्व धोक्यात आले. त्यांचा निर्दयपणे छळ करण्यात आला. अनेक महापुरुषांनी स्त्रियांना अधिकार आणि सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. भारतीय संविधानाने स्त्रियांचा आदर सन्मान केला. त्यांना अनेक हक्क-अधिकार दिले. संविधानातील कलम क्रमांक १४ नुसार समानतेचा अधिकार मिळाला.[३७] कलम क्रमांक १५ नुसार कोणत्याही स्वरूपाचा लिंगभेद करता येणार नाही.[३८] असे स्पष्टपणे सांगितले आहे. तसेच स्त्रियांसाठी विशेष कायदे करण्याचे राज्याला अधिकार दिलेले आहेत. कलम १६ नुसार महिलांना नोकरीची समान संधी देण्यात आली.[३९] कलम २३ आणि २४ नुसार महिलांचे किंवा बालिकांचे शोषण करता येणार नाही.[४०] शोषणाला विरोध करण्यात आला. कलम २१ नुसार महिलांना जीविताचा, सन्मानाचा, शिक्षणाचा अधिकार मिळाला.[४१] कलम २९ आणि ३० नुसार अल्पसंख्यांक समुदायाच्या महिलांना अधिकार मिळाला.[४२] कलम क्रमांक ५१(ड.) नुसार महिलांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य सांगितले आहे.[४३] संविधानाचे कलम क्रमांक २४३(घ) नुसार महिलांना पंचायती आणि महानगर आणि नगरपालिका यामध्ये आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.[४४] विधिमंडळ आणि संसदेतील महिला आरक्षण प्रतीक्षेत आहे. आज महिला विविध क्षेत्रात आहेत. त्याचे श्रेय संविधानाला द्यावे लागेल. प्राचीन काळापासून महिलांना हक्कासाठी लढणाऱ्या महापुरुषांच्या विचारांचे सार भारतीय संविधानात आहे.

**पर्यावरण संरक्षण आणि संविधान**

भारतीय संविधानाने पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वाच्या तरतुदी केल्या आहेत. कलम क्रमांक २१ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी आणि प्रदूषणमुक्त वातावरण हा मूलभूत जीविताचा अधिकार सांगितलेला आहे.[४५] कलम क्रमांक ४८(क) नुसार राज्याने पर्यावरण, वन आणि वन्यजीव यांचे संरक्षण करणे ही जबाबदारी सांगितलेले आहे. [४६] कलम क्रमांक ५१ (क) मधील (छ) नुसार पर्यावरणाचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य सांगितलेले आहे.[४७]

वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिगत करणे आपला धर्म , भाषा, संस्कृती इत्यादींचे जतन करणे या अधिकाराबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करणे ही संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला जबाबदारी दिलेली आहे. संविधानातील कलम क्रमांक ५१ (क) च्या (ज) नुसार प्रत्येक नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे[४८] हे कर्तव्य सांगितलेले आहे. आपल्या आदर्श, समृद्ध परंपरा जतन करण्याचा अधिकार आणि प्रागतिक विचारधारा जोपासण्याचे कर्तव्य याद्वारे भारतीय संविधानाने समतोल साधलेला आहे. आजही अनेक अंधश्रद्धा आणि अनिष्ट प्रथा समाजात आहेत. त्या नष्ट होऊन समाजात प्रगतिक विचारधारा वाढीस लागली पाहिजे. समाजात बुद्धीप्रमाण्यवाद किंवा विवेकवाद निर्माण झाला पाहिजे असे संविधान कलम क्रमांक ५१(क) च्या (ज)मध्ये सांगितलेले आहे.

संविधानाने दिलेले आरक्षण उपेक्षित, वंचित, महिला वर्गाला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रशासकीय संधी देण्यासाठी संविधानाने आरक्षणाची तरतूद केली. सामाजिक आणि शैक्षणिक समानता निर्माण करणे व प्रत्येक जातीला त्यांचे प्रतिनिधित्व देण्याचा उदात्त हेतूने आरक्षणाची तरतूद केलेली आहे. संविधानातील कलम क्रमांक १५(४), १५(५) १६(४) नुसार

आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे.[४९] सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास हा आरक्षणासाठीचा निकष आहे, तसेच २०१९ साली १०३ व्या घटना दुरुस्ती विधेयकाद्वारे कलम १५(६), १६(६) नुसार आर्थिक दुर्बल घटकांना (EWS) भारत सरकारने १०% आरक्षण दिले आहे. [५०]

**सारांश**

अशा असंख्य हक्क, अधिकार आणि कर्तव्यांची तरतूद भारतीय संविधानात केलेली आहे. आपल्या देशातील गावपातळीपासून ते दिल्लीपर्यंतचा कारभार संविधानानुसार चालतो. ग्रामपंचायत, विधिमंडळ, संसद, न्यायालय, निवडणुका आयोग, तसेच अनेक संस्था संविधानाच्या अधीन राहून आपला कारभार करतात. आपले मूलभूत अधिकार लपवून ठेवले असतील तर कलम २२६ नुसार उच्च न्यायालयात.[५१] आणि कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते.[५२] डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात संविधानातील कलम क्रमांक ३२ हा संविधानाचा आत्मा आहे.

आपल्या देशात समता प्रस्थापित व्हावी, महिलांना अधिकार मिळावेत. सर्वांना मोफत शिक्षण मिळावे, अंधश्रद्धा दूर व्हावी व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, पर्यावरणाचे रक्षण व्हावे, राष्ट्रभक्ती जागृत व्हावी यासाठी शेकडो वर्षांपासून अनेक महामानवांनी अथक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे सार आपल्याला संविधानात दिसते. आपले संविधान लिखित आहे. ते व्यापक आहे. ते संकुचित नाही. ते जेवढे कठोर एवढेच परिवर्तनीय आहे. संविधानाच्या चौकटीतच राष्ट्रहिताचे कायदे करण्याचे स्वातंत्र्य आपले संविधान देते. आपले संविधान न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही इत्यादी मूल्यावर आधारलेले आहे.

संविधानाने सर्व समाज घटकांचा, धर्मांचा, जातींचा, भाषांचा, प्रांतांच्या हक्क आणि कर्तव्यांचा विचार केलेला आहे. आपले संविधान व्यापक आहे. आपल्या सार्वभौम लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. वैविध्यपूर्ण भारत देशाला एकसंघ आणि मजबूत ठेवण्याचे महान काम संविधानाने केलेला आहे, त्यामुळे संविधान हा आपल्या संसदीय लोकशाहीचा मजबूत असा आधारस्तंभ आहे.

**संदर्भसूची**

१) प्रा. भिडे गजानन, आधुनिक भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस तिसरी आवृत्ती, २००८, पृष्ठ क्र. १२६

2) तत्रैव पृष्ठ क्र. १३६

3) बि चंद्र बिपन (मराठी अनुवाद - मा कृ पारधी), स्वातंत्र्याचा लढा , नॅशनल बुक ट्रस्ट, आवृती चौथी, २००८, पृष्ठ क्र. १५९

४) सौ. क्षीरसागर शोभादेवी (प्रकाशक), आधुनिक भारताचा इतिहास , के सागर पब्लिकेशन्स आवृत्ती अकरावी, २0११, पृष्ठ क्र. २६४

५) पवार दया (निमंत्रक-संपादक मंडळ) डॉ बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १४, प्रथमावृत्ती (पुनर्मुद्रण) ऑक्टोबर १९९९, पृष्ठ क्रमांक ३५५

६) काश्यप सुभाष, हमारा संविधान- भारत का संविधान और संवैधानिक विधि, राष्ट्रीय पुस्तक न्यास ( National book Trust, India) छठी आवृत्ती २०१७, पृष्ठ क्र. ३०

७) पवार दया (निमंत्रक-संपादक मंडळ) डॉ बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पूर्वोक्त , ३५७

८) काश्यप सुभाष, हमारा संविधान- भारत का संविधान और संवैधानिक विधि, पूर्वोक्त, पृष्ठ क्र.3१

९) तत्रैव पृष्ठ क्र.३३

१०) संचालक शासन मुद्रण व लेखनसामग्री,महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, भारताचे संविधान, सातवी आवृत्ती, पृष्ठ क्र. १९

११) तत्रैव पृष्ठ क्र.१५७

१२) तत्रैव पृष्ठ क्र. १

१३) तत्रैव पृष्ठ क्र. ६

१४) तत्रैव पृष्ठ क्र. ६

१५)) तत्रैव पृष्ठ क्र. ६

१६) तत्रैव पृष्ठ क्र.७

१७) तत्रैव पृष्ठ क्र.८

१८) तत्रैव पृष्ठ क्र.८

१९) तत्रैव पृष्ठ क्र.८

२०) तत्रैव पृष्ठ क्र.९

२१) तत्रैव पृष्ठ क्र.९

२२) तत्रैव पृष्ठ क्र.९

२३) तत्रैव पृष्ठ क्र.९

२४) तत्रैव पृष्ठ क्र.११

२५) तत्रैव पृष्ठ क्र.११

२६) तत्रैव पृष्ठ क्र.११

२७) तत्रैव पृष्ठ क्र.९

२८) तत्रैव पृष्ठ क्र.९

२९) तत्रैव पृष्ठ क्र.९

३०) तत्रैव पृष्ठ क्र.६

३१) तत्रैव पृष्ठ क्र.१२

३२) तत्रैव पृष्ठ क्र.११

३३) तत्रैव पृष्ठ क्र.१८

३४) तत्रैव पृष्ठ क्र.१८

३५) तत्रैव पृष्ठ क्र.१८

३६) तत्रैव पृष्ठ क्र.२०

३७) तत्रैव पृष्ठ क्र.६

३८) तत्रैव पृष्ठ क्र.६

३९) तत्रैव पृष्ठ क्र.७

४०) तत्रैव पृष्ठ क्र.११

४१) तत्रैव पृष्ठ क्र.९

४२) तत्रैव पृष्ठ क्र.१२

४३) तत्रैव पृष्ठ क्र.२०

४४) तत्रैव पृष्ठ क्र.८६

४५) तत्रैव पृष्ठ क्र.९

४६) तत्रैव पृष्ठ क्र.१९

४७) तत्रैव पृष्ठ क्र.२०

४८) तत्रैव पृष्ठ क्र.२०

४९) तत्रैव पृष्ठ क्र.६

५०)४ ऑनलाईन PDF

५१) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित भारताचे संविधान पूर्वोक्त पृष्ठ क्र. ७५

५२) तत्रैव पृष्ठ क्र.१४